
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 13 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2023

# शशिकांत तासगावकर यांच्या कथेचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये

विनोद जंगल लंकेश्वर
संशोधक विद्यार्थी , मु. पो. तांदुळवाडी ता. माढा जि. सोलापूर.
डॉ. नवनाथ अंगद शिंदे
संशोधन मार्गदर्शक , सहयोगी प्राध्यापक आणि विभाग प्रमुख मराठी विभाग कला,
वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सात्रळ ता.राहुरी, जि. अहमदनगर.

## प्रास्ताविक -




मानव हा कथाप्रिय प्राणी आहे. कथा ऐकणे आणि सांगणे हा त्याचा मूलतः स्वभाव आहे.या प्रक्रियेतून कथा या वांग्मय प्रकाराचा उगम झाला, म्हणूनच कोणत्याही भाषेत कथा हा वांग्मय प्रकाराला बहर आलेला दिसून येतो. भारतातील कथा या वांग्मय प्रकाराचे मुळ लोककथांमध्ये सापडते. सुरुवातीची कथा ही पद्य स्वरूपात अवतरलेली दिसते.आख्यान कविता,कथागीते,पोवाडा इत्यादी प्रकारांमधून कथा प्रकट होताना दिसते. लोकांचे मनोरंजन करून त्यांना अध्यात्माचे आणि श्रद्धेचे धडे देणे हे एकमेव प्रयोजन कथा लिहिण्यामागे होते.

शोध हा मानवी मनाचा उपजत गुण असल्याने माणूस समाजाचा, संस्कृतीचा, आणि स्वत्वाचा सर्जनशीलतेने शोध घेण्याचा प्रयत्न करतो.त्याच्या चिंतनातून, निरीक्षनातून कलात्मकतेचे दालन प्रत्येक टप्प्यावर समृद्ध झाल्याचे दिसून येते. कथा या साहित्यप्रकाराकडे कलात्मकतेचा एक सुजन आविष्कार म्हणून पाहिले जाते.

पौराणिक कथेपासून ते अलीकडील नवकथेपर्यंतच्या प्रवासात कथेमध्ये आशय, विषय, शैली, प्रवाह यामध्ये अमूलाग्र बदल झालेले दिसून येतात. मराठी कथा साहित्य प्रकारांमध्ये १९६०नंतर विविध कथासाहित्य प्रवाह निर्माण झाले आहेत. त्यामध्ये मुख्यत्वे ग्रामीण कथा, दलित कथा, स्त्रीवादी कथा, आदिवासी कथा इ.

## १) शशिकांत तासगावकर यांचे दलित कथेतील स्थान -:

फुले, शाहू,आंबेडकर यांच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, परिवर्तनवादी विचारातून प्रभावित होऊन शशिकांत तासगावकर यांनी आपले लेखन केले. बालपणापासून त्यांच्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव दिसून येतो. याच प्रेरणेतून त्यांनी कथा, कविता,कादंबरी, प्रवासवर्णन,शाहिरी गीते असे विविध साहित्यप्रकार आपल्या प्रतिभेच्या साह्याने आविष्कृत केले आहेत. नव्या पिढीतील दलित कथाकार म्हणून शशिकांत तासगावकर यांचा उल्लेख करावा लागतो. त्यांच्या कथा ह्या स्वानुभवातून आकाराला आल्या असल्याने त्या जिवंत वाटतात.

## २) शशिकांत तासगावकर यांच्या कथा साहित्याचे स्वरूप -:

**१) मुक आक्रोश -** शशिकांत तासगावकर यांचा पहिला कथासंग्रह आहे. हा कथासंग्रह मनोकामना प्रकाशन इस्लामपूर यांनी प्रकाशित केला आहे.२००० साली प्रकाशित झालेल्या या कथासंग्रहात एकूण बारा कथांचा समावेश करण्यात आला आहे शशिकांत तासगावकर यांनी हा कथासंग्रह एन.डी. पाटील, आ.ह साळुंखे, टी.एस.पाटील यांच्या पुरोगामी विचारांना अर्पण केला आहे.

१) भूक २) आई आजी होते तेव्हा ३) दानशूर ४)गुंता ५) बाबासाहेबांनी काय सांगितलंय ६)लक्ष्मी आईची जत्रा७) वाळीत ८)बळी९) भुर्दंड १०) डोनेशन ११) मला देवाला भेटायचंय १२) मूक आक्रोश

शशिकांत तासगावकर यांचा या कथांमधून त्यांनी ग्रामीण भागातील दलित जीवनावर प्रकाशझोत टाकला आहे त्यांची भूक ही कथा अत्यंत संवेदनशील ठरते. यामध्ये राजा, भिकाबाई,बाजीराव, गुजाबा ची बायको लक्ष्मी,भीमा,नानी या पात्रांच्या आधारे भूक ही कथा शशिकांत तासगावकर यांनी जिवंत करण्याचा प्रयत्न केला आहे. भिकाबाई आणि राजा यांची दारिद्र्याशी दिली जाणारी झुंज आणि त्यातून त्यांना दररोज भुकेला सामोरे जावे लागते, भाकरीसाठी त्यांना आपला स्वाभिमान गहाण टाकण्याची वेळ येते. भुकेची तीव्र वेदना त्यांना कोण कोणते कृत्य करायला भाग पाडते,याची विदारकता त्यांच्या कथेत स्पष्ट झाल्याचे दिसते.

**२) चोराचे गहू -** हा शशिकांत तासगावकर यांचा दुसरा कथासंग्रह (२००५)साली प्रकाशित झाला. तासगावकर यांचा हा विनोदी कथासंग्रह असून यातील बहुतेक कथा ग्रामीण आणि दलित जीवनाशी निगडित आहेत. वामन होवाळांच्या प्रेरणेतून या कथा साकार झालेल्या आहेत. समाजातील रूढी, परंपरा,अंधश्रद्धा या विनोदी शैलीच्या अंगाने कथेत मांडल्या आहेत. तासगावकर यांच्या कथा या केवळ विनोदी आशयात न रमता त्या प्रबोधनाच्या अंगाने साकार झालेल्या दिसतात.समाजातील विसंगतीवर अचूकपणे बोट ठेवून अस्सल बोलीभाषेतून या कथा जिवंतपणे अविष्कृत झाल्या आहेत. ते स्वतः म्हणतात " मी कथाकथनाचा अगदी ध्यासच घेतला स्व. शंकर पाटील द. मा. मिरासदार व. पु. काळे, वामन होवाळ यांच्या सारखा लोकप्रिय कथाकथनकार होण्याची स्वप्ने मी बघू लागलो "१

दलित समाजातील विसंगतीवर त्यांनी ' बाबासाहेबांनी काय सांगितलंय' या कथेतून अचूकपणे बोट ठेवले आहे. बाबासाहेबांच्या विचारांना हरताळ फासून समाज कशा पद्धतीने विसंगत वर्तन करतो आहे, व्यसन आणि पुढारीपण या नादात समाज कसा उद्‌ध्वस्त होत आहे, याचे जळजळीत वास्तव शशिकांत तासगावकर यांनी कथेत मांडले आहे." नरसूला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयी भलता अभिमान होता, पण त्यांच्या तत्वांना राख पासून तो आडदांडपणे वागत होता."२ अशा प्रकारे समाजातील वाईट प्रवृत्तीचे चित्रण त्यांनी आपल्या अनेक कथेतून केले आहे.

' वाळीत ' या कथेतून त्यांनी बौद्ध समाजातील स्वतःला पुरोगामी समजणाऱ्या कुटुंबाचा ढोंगी चेहरा समोर आणला आहे.

**वारं -** हा शशिकांत तासगांवकर यांचा विनोदी कथासंग्रह २००६ साली प्रकाशित झाला. या कथासंग्रहातील कथा या अत्यंत लोकप्रिय ठरल्या आहेत. समाजातील रूढी,परंपरा, अंधश्रद्धा यावर विनोदी आणि उपहासात्मक अंगाने कथेची मांडणी करून समाजातील कुप्रवृत्तीचा तासगावकर यांनी समाचार घेतला आहे.

## ३) शशिकांत तासगावकर यांच्या कथांचे वर्गीकरण -

**१) दलित जीवन विषयक कथा -** दलित जीवनावर भाष्य करणारे कथाकार म्हणून तासगावकर यांचा उल्लेख केला जातो. त्यांचे तीन कथासंग्रह असून दलित जीवनावर भाष्य करणाऱ्या काही कथा आल्या आहेत.१) बाबासाहेबांनी काय सांगितलंय २) वाळीत ३) दानशूर ४) गुंता इ. कथांमधून त्यांचा दलित समाजातील बदलत्या जाणिवांचा वेध घेण्याचा प्रयत्न चिंतनीय ठरतो

**२) स्त्री जीवन विषयक कथा -** दलित समाजातील स्त्रीकडे ग्रामीण भागात कशाप्रकारे एक भोगवस्तू म्हणून पाहिले जाते.तिचे माणूसपण कशाप्रकारे चिरडले जाते, याचे हृदयस्पर्शी चित्रण त्यांच्या अनेक कथांमधून दिसून येते.त्यांच्या कथेतील स्त्री पात्रांच्या तोंडी येणारे सवांद हे अत्यन्त वैचारिक आणि प्रगल्भ आहेत." माणूस बदललेला नाही अनादीकाळापासून चिकटलेल्या विकारांपासून तो मुक्त झालेला नाही आणि होईल याची शक्यता ही वाटत नाही "३ त्यांच्या कथेतील येणाऱ्या स्त्री नायका भारतीय समाजातील स्त्री शोषित व्यवस्थेचे प्रतिनिधित्व करतात, शिवाय त्या विरोधात बंड करताना दिसतात.

**३) कौटुंबिक कथा -** तासगावकरांच्या कौटुंबिक कथा हया मानवी जीवनातील नात्यांची भावविवशता अधिक सखोलपणे स्पष्ट करतात. आई आजी होती तेव्हा, ममईवाले, चोराचे गहू, टी. व्ही येता घरा, बळी इ. कथामधून त्यांची सूक्ष्म निरीक्षणशक्ती आणि व्यापक कल्पनाशक्तीचा प्रत्यय येतो.

**४) विनोदी कथा -** शशिकांत तासगावकर यांचे' चोराचे गहू,' 'वारं ' हे विनोदी कथासंग्रह आहेत. द.मा. मिरासदार, शंकर पाटील, वामन होवाळ या कथाकारांचा खूप मोठा प्रभाव त्यांच्या कथावर दिसून येतो.वारं, मसनवटीतली भुतं,अन्यथा आत्मदहन, साहित्य संमेलनाचे तमाशे, लव कोड, मी दादागिरी करतो. इ कथेमध्ये त्यांनी खुमासदार विनोदी वर्णने केली आहेत.

वारं या कथासंग्रहाच्या अर्पणपत्रिकेत ते लिहितात " ज्येष्ठ बंधू वामन होवाळ गुरुवर्य द.ता.भोसले यांच्या विनोद बुद्धीला आणि आचार्य अत्रे, भाई पूल यांच्या कलंदर तितक्याच कणखर बाण्याला "४ त्यांनी हा कथासंग्रह अर्पण केला आहे.

## ४) शशिकांत तासगावकर यांच्या कथेची वैशिष्ट्ये -:

शशिकांत तासगावकर यांनी दलित जाणिवेतून आपल्या कथा लिहिल्या आहेत. पहिल्या पिढीतील दलित कथाकारांच्या कथेतील वेदना विद्रोह तासगाव करांच्या कथेत दिसून येतो त्याबरोबरच दलित समाजातील बदलत्या जाणिवांचा शोध आणि वेध घेण्याचा प्रयत्न शशिकांत तासगावकर यांनी आपल्या कथांमधून केलेला आहे. त्यांच्या कथित केवळ दलितांचे दुःख आणि वेदना दिसत नाही, तर समाजातील वैगुण्यावर ते तितक्याच ताकदीने प्रहार करताना दिसतात.त्यांच्या कथेविषयी डॉ. सुरेश गायकवाड यांचे मत विचारात घेण्यासारखे आहे." महार,मांग सुद्धा परस्परांना कसे श्रेष्ठ-कनिष्ठ समजतात परिवर्तनाचे कार्य किती कठीण आहे याचे उपाहासगर्भ, तितकेच मनोज्ञ वर्णन तासगावकर आपल्या कथेत करतात. "५

तासगावकर यांच्या कथेत भूक,दारिद्रय, लाचारी,स्त्रियांचे शोषण इत्यादी प्रश्नाबरोबरच त्यांनी अंधश्रद्धेवर ही आपल्या कथेतून मोठा प्रहार केलेला दिसून येतो. डॉ. आंबेडकरांनी धर्मांतर केले आणि सर्व दलित समाजाला पारंपरिक रूढी परंपरेच्या जोखडातून मुक्त केले, त्यांना जगण्याची नवी ऊर्जा निर्माण करून दिली; मात्र आजही गावगाड्यातील दलित समाज हा अंधश्रद्धा निमूटपणे पाळताना दिसून येतो. या सर्व गोष्टीवर तासगावकर यांनी अनेक कथांमधून प्रहार केला आहे. डॉ. आंबेडकर यांनी दिलेले तत्त्वज्ञान आपल्याला एक परिपूर्ण जीवन देणार आहे असा आशावाद तासगावकर त्यांच्या कथेतून दिसून येतो.

## ५) शशिकांत तासगावकर यांच्या कथेच्या प्रेरणा -:

तासगावकर आपल्या कथालेखनाच्या प्रेरणा अण्णाभाऊ साठे, वामन होवाळ, योगीराज वाघमारे, द.ता. भोसले या आहेत म्हणूनच तासगावकर यांच्या कथेतून भूक, दारिद्र्य, बेकारी यांचे हृदयद्रावक चित्र दिसून येते. तासगावकर यांच्या कथेवर अण्णाभाऊ साठे यांच्या कथांची छाप दिसून येते म्हणूनच तासगावकर अण्णाभाऊंना आपले गुरू मानतात. दलित कथेचे जनक अण्णाभाऊ साठे आहेत. असे तासगावकर आपल्या अनेक वैचारिक लेखातून स्पष्टपणे सांगतात.

तासगावकर यांच्या कथा लेखनासाठी ज्याप्रमाणे प्रेरणा महत्त्वपूर्ण ठरतात तद्वतच त्यांनी अनुभवलेला विदारक भूतकाळ या प्रेरणामध्ये दिसून येतो. त्यांनी अनुभवलेल्या सामाजिक अहवेलनेतून,वेदनेतून त्यांचे मन अस्वस्थ होत गेले. या साऱ्यांचे विरेचन तासगावकर यांच्या कथेतून दिसून येते. याविषयी डॉ. कृष्णा किरवले यांचे मत अधिक संयुक्त ठरते.

" दलित साहित्य सामाजिक वास्तवतेचे केंद्रित आहे दलित साहित्यिक कल्पनेतून साहित्याची निर्मिती करीत नाहीत स्वतःचे दुःख आणि दारिद्र्य याबरोबरच दलित समाजाची मागासलेली अवस्था हजारो वर्षापासून चालत आलेली अस्पृश्यते सारखी अमानुष जुलमी व्यवस्था भूक आणि आन्ना साठी चाललेला दृढ संघर्ष इत्यादी सामाजिक समस्या दलित साहित्यिकाला हैराण करतात "६

तासगावकर यांचे कथालेखन वरील भूमिकेतून जन्माला आले आहे. त्यांचे साहित्य रंजनाच्या उद्देशाने निर्माण झालेले नाही ,तर दलित साहित्याचा मुख्य उद्देश जो समता,स्वातंत्र्य, बंधुत्व, प्रस्थापित करायचे आहे हाच आहे.तासगावकर यांच्या कथा लेखनात दलित जाणिवा प्रखरपणे प्रवाहित होताना दिसतात.

तासगावकर यांच्या कथा या विद्रोही अंगाने सादर झालेल्या असल्यातरी त्यांना फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचारांची किनार लाभली आहे त्यामुळे त्यांच्या कथेतील विद्रोहाला सम्यक मूल्ये आहे. " दलित शब्दांच्या नवीन अर्थ वलयात विद्रोहाला महत्त्वाचे स्थान आहे हा विद्रोह विध्वंसक नाही तर केवळ वैचारिक आहे हिंसात्मक मार्ग या विरोधात नसून आंबेडकरी तत्त्वज्ञानाची वैचारिक पार्श्वभूमी त्याला लाभली आहे "७

## तासगावकरांच्या कथेची भाषाशैली -:

शशिकांत तासगावकर यांनी आपल्या कथेत प्रादेशिक बोली भाषेचा वापर अधिक केलेला दिसून येतो. क्वचित प्रसंगी त्यांनी प्रमाण भाषेचा वापर केलेला आहे सातारा परिसरातील बोलीभाषेचा वापर केल्याने त्यांच्या कथा या जिवंतपणे साकार झाल्या आहेत. तासगावकर यांची भाषा ही मनाला भिडते ही भाषा साधीसोपी आहे तिच्यात आलंकाराचा वापर नाही. त्यांच्या अनुभवातून ती सरळ अवतरते आणि म्हणूनच त्यांचे सर्व कथानक वाचकाला आपलेसे वाटते.उदा : " कशाला रं पावसाला बोलीवतुयास "८ यातील बोलीवतुयास सातारा परिसरात बोलला जाणारा शब्द आहे. करूनशान, खाऊनशान जाऊनशान गिल्तु, आल्तु म्होरं, वाईच, पुढ्यात,खुळ्यागत, करगुटा, पैकं,किस्ता, लई,न्हाय, त्यास्नी असे अनेक प्रादेशिक बोली भाषेतील शब्द तासगावकर यांच्या कथेत अधूनमधून येतात.

## समारोप -:

दलित साहित्याचे नव्या पिढीतील सिद्धहस्त कथाकार म्हणून शशिकांत तासगावकर यांचा उल्लेख करावा लागतो.भूक वेदना विद्रोह आणि आंबेडकरी विचारधारा यांचा अंतर्भाव शशिकांत तासगावकर यांच्या कथेमध्ये दिसून येतो. या बरोबरच त्यांनी समाजातील वैगुण्यावर अचूकपणे बोट ठेवले आहे . समाजातील रूढी परंपरा अंधश्रद्धा यावरही त्यांनी प्रहार केला आहे. दलित जाणिवेतून दलित जीवनाविषयीचे चिंतन त्यांच्या कथेतून दिसून येते

## निष्कर्ष -:

१) शशिकांत तासगावकर यांची कथा आंबेडकरी विचारधारेतून जन्माला आली आहे
२) तासगावकर यांची कथा दलित्वाची,अस्मितेची, सामाजिक बांधिलकीची, जाणीव व्यक्त करते.
३) कथेतून पारंपरिकता आणि आंबेडकरवाद या विचारांचा संघर्ष पाहायला मिळतो.
४) तासगावकर आपल्या कथेत उपेक्षित शोषित वंचित अशा सर्व सामाजिक घटकांचा वेध घेतात.
५) तासगावकर आपल्या कथेत अंधश्रद्धा आणि कर्मकांड यावर विनोदी शैलीने भाष्य करतात.
६) स्वानुभव आणि संवेदनशीलता यामुळे तासगावकर यांची कथा अधिक वास्तववादी ठरते.
७) म्हणी, वाकप्रचार, सुभाषिते, लोकगीते, बोलीभाषा यांचा वापर कथेत दिसून येतो.
८) अनेक कथांमधून लोककलावंतांची ससेहोलपट दिसून येते

## संदर्भ -:

१) तासगावकर शशिकांत 'चोराचे गहू' सावली प्रकाशन -पुणे प्र.आ -२००५ पृ. क्र.- ६१
२) तासगावकर शशिकांत 'मूक आक्रोश' मनोकामना प्रकाशन इस्लामपूर - २००० पृ. क्र. ५७
३) तत्रेव, पृ क्र. १३१
४) तासगावकर शशिकांत 'वारं ' विक्रम उद्योग प्रकाशन- पुणे. प्र.आ. - २००५ पृ.क्र.३
५) गायकवाड सुरेश ( विधवेच्या जीवनाची परवड चित्रित करणारी कादंबरी( गिधाड ) दै. पुढारी १२ऑगस्ट- १९९८

६) किरवले कृष्णा' दलित चळवळ आणि साहित्य' प्रतिमा प्रकाशन- पुणे प्र. आ.-१९९६ पृ. क्र.१०२

७) तत्रैव -पृ क्र. १४३

८) तासगावकर शशिकांत 'मूक आक्रोश' मनोकामना प्रकाशन इस्लामपूर, प्र. आ.- २००० पृ क्र. ५